# मेट्रो, एमटीएचएल प्रकल्प उलगडणार प्रदर्शनातून



मुंबई पिरामल आर्ट गॅलरीत भरवलेल्या प्रदर्शनाचे गुरूवारी उद्घाटन झाले.

**मुंबई :पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ या भुयारी मार्गाचे बांधकाम तसेच शिवडी न्हावा शेवा सागरी सेतूची जडणघडण प्रदर्शनाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी मुंबईकरांना मिळणार आहे. पिरामल आर्ट गॅलरीत भरवण्यात आलेल्या प्रदर्शनात या प्रकल्पांची कहाणी उलगडणार आहे. १५ दिवसांच्या छायाचित्र प्रदर्शनासह नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) ने नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीचे उद्घाटन गुरूवारी झाले. याच गॅलरीत हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे.

मुंबईतील पहिला भुयारी मेट्रो मार्ग आणि सागरी सेतू हे दोन्ही प्रकल्प बांधकामाच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक आहेत. मेट्रोसाठी तब्बल ३०.५० किमीची भुयारे खोदण्यात आली आहेत. सागरी सेतूचे बहुतांश काम हे भर समुद्रात करण्यात आले आहे.

या प्रकल्पाचे बांधकाम करतानाची चित्त थरारक दृष्य छायाचित्राच्या माध्यमातून पाहण्याची तसेच अभियांत्रिकी अविष्कार व प्रकल्पाची जटिलता या प्रदर्शनाच्या माध्यमातून समजावून घेता येईल.

**● एनसीपीएच्या नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीत मुंबई मेट्रो मार्ग-३, मुंबई सागरी मार्ग आणि सागरी सेतू सारख्या प्रकल्पाच्या निर्मितीची अनुभूती या छायाचित्र प्रदर्शनातून अनुभवता येणार आहे. हे प्रदर्शन मुंबईकरांना ३ मार्च ते १६ मार्च दरम्यान दुपारी १२ ते ८ या वेळेत पाहता येणार आहे.**